# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक

**"भारतरत्न जे. आर. डी. टाटा गुणवंत संशोधक शिष्यवृत्ती योजना" अर्ज करण्यासाठी मुदतवाढ**

विद्यापीठ विभागात पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी सन २०१८ मध्ये नव्याने प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांकरीता **"भारतरत्न जे. आर. डी. टाटा गुणवंत संशोधक शिष्यवृत्ती योजना"** विहित केलेल्या नियम व अटीनुसार लागू करण्यात आलेली आहे. सदर शिष्यवृत्ती योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन (online) पध्दतीने **दिनांक २८/०२/२०१९** पर्यत अर्ज मागविण्यात आलेले आहेत.

या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधितांना पुन:श्च कळविण्यात येते की, सदर शिष्यवृत्ती योजनेससाठी पात्र विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या http://bcud.unipune.ac.in या लिंकवर Ph.D. Tracking या लिंकवर क्लिक करून ऑनलाईन **(Online)** पध्दतीने अर्ज करण्यासाठी **दि. ०८/०३/२०१९** पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तसेच ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत खाली नमूद केलेल्या कागदपत्रासह, तसेच मार्गदर्शक व विभागप्रमुख यांच्या शिफारशीसह **दि. ११/०३/२०१९** पर्यत शैक्षणिक प्रवेश विभागात प्रत्यक्ष हस्तपोच सादर करावेत. उशिराने प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**आवश्यक कागदपत्रे :—**

१. **पदवीप्रमाण पत्राची साक्षांकित प्रत** (Marks Statement of Master Degree.)
२. **पीएच.डी. प्रवेशपत्र** (Provisional/Confirmation Admission Letter.)
३. **हमीपत्र** (Undertaking on Plain Paper.)
४. **संशोधनाबाबतचा संक्षिप्त गोषवारा.** (Brief proposal of Topic Research.)

सही/- २८/२/२०१९

उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र.: शै. प्रवेश/७०६
दिनांक : २८/०२/२०१९

प्रत :— माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी

मा. विभागप्रमुख सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
सदर परिपत्रक आपल्या विभागातील सर्व संबंधित विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.